वर्ष- १० अंक- २२ मुंबई, मंगळवार, १६ एप्रिल ते २२ एप्रिल २०२४ पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024
पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 तरुणीवर अत्याचार करून ठार मारण्याचा प्रयत्न
3 → पुतीन यांच्या विजयाचा अन्वयार्थ
रंगाला अनुसरुन करा मेकअप → 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

वेशांतर करून चोरट्याला ठोकल्या बेड्या

हायटेक, हायफाय चोराच्या अटकेसाठी पोलीस पोहोचले आसामला

ठाणे : ठाणे, नवी मुंबई आणि ठाणे जिल्हा परिसरात चोऱ्यांची मालिका करत राज्याबाहेर विमानाने पाळणाऱ्या हायफाय चोरट्याला पकडण्यासाठी ठाणे गुन्हे शाखेच्या शिलेदारांनी वेषांतर करून त्याचा माग काढला. रमजान महिन्यासाठी आपल्या मूळगावी आसाम येथील होजाई जिल्ह्यात आलेल्या या हायफाय चोरट्याला पकडण्यासाठी पोलीस तिथे पोहोचले आणि मोईनुल अब्दुल मलीक इस्लाम नावाच्या या तरुणाच्या अखेर मुसक्या आवळल्या. त्याने २२ घरफोड्यांची कबुली दिली असून, त्याच्याकडून ८८९ ग्रॅम वजनाचे ६२ लाख २४ हजार किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले. त्याला ठाणे न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावलेली आहे.

अटक सराईत चोरटा मोईनुल हा मूळचा आसाम राज्यातील होजाई जिल्ह्यातील सामरोली गाव, चौधरी बाजार येथील रहिवाशी आहे. त्याने आतापर्यंत नवी मुंबईत ७ गुन्हे, ठाणे जिल्ह्यात १९, मुंबईत १ आणि नवी मुंबईत २ असे २२ गुन्हे केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी ८८९ ग्रॅम वजनाचे ६२ लाख २४ हजार किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात यश मिळवले. आरोपी मोईनुल हा मुंबईत भाड्याने घर घेऊन राहत होता. तो मोबाईल वापरत नव्हता. वापरलाच तरी तो गुन्हा करताच मोबाईल बंद करायचा, चोरी करण्यापूर्वी तो रेकी करून नंतर चोरी करायचा आणि विमानाने आसाम आणि नागालँडसारख्या आदिवासी राज्यात लपून बसायचा. वातावरण निवळले की, पुन्हा मुंबईत भाड्याच्या घरात येऊन अंदाज घ्यायचा आणि पुन्हा चोऱ्या विविध भागांत करून पुन्हा विमानाने लपण्यासाठी जायचा आणि विमानाने तातडीने चोरी करण्यासाठी यायचा अशी त्याची हायफाय कार्यपद्धती होती. याबाबत गुन्हे शाखेच्या पथकाला कुणकुण लागलेली होती. पोलीस आयुक्तांच्या आदेशाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांनी घरफोडी चोरीच्या गुन्हे उघडकीस आणण्याकरता सहायक पोलीस निरिक्षक धनराज केदार, पोलीस हवालदार अमोल देसाई, पोलीस नाईक सचिन जाधव, पोलीस शिपाई भावेश घरत, अमोल इंगळे यांचे विशेष पथक स्थापन केले. या पथकाने त्याच्या मूळ गावी आसाम येथील होजाई पोलिसांच्या मदतीने चौकशी केली. या वेळी तो रमजान महिना सुरू असल्याने गावी आल्याचे समजताच पोलिसांनी त्वरित कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. मात्र या वेळी देखील त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला, अशी माहिती ठाणे पोलिसांनी दिली. सध्या त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळाली असून, याआधी देखील नवी मुंबई पोलिसांनी त्याला अटक केली होती, अशी माहिती पोलिसांनी दिली. अधिक तपास ठाणे गुन्हे शाखेतर्फे करण्यात येत आहे.

मुलांना भीक मागायला लावणाऱ्या तीन महिला गजाआड

मुंबई : गुन्हे शाखेच्या विशेष बाल संरक्षण पोलीस पथकाने अंमलबजावणी कक्ष आणि महिला अत्याचार प्रतिबंध कक्षाच्या मदतीने मालाडमधून भीक मागणाऱ्या १३ मुलांची सुटका केली आहे. या प्रकरणात लहान मुलांचा नीट सांभाळ न करता त्यांना भीक मागण्यास लावणाऱ्या भारती अर्जुन पचारे (२०), हसीना शेशबाबू पवार (२०), अर्मिना सागर भोसले (३५) आणि टिंगू हर्शलदास पवार (३५) या चार महिलांविरोधात बांगुरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

१३ मुलांची सुटका

मालाड पश्चिमेकडील मढ-मार्वे रोड येथील मिठ चौकी जंक्शन परिसरात मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुले भीक मागत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या विशेष बाल संरक्षण पोलीस कक्षाला मिळाली होती. या माहितीची पडताळणी करत या पथकाने अंमलबजावणी कक्ष आणि महिला अत्याचार प्रतिबंध कक्षाच्या मदतीने बुधवारी सकाळी ही कारवाई केली. या वेळी तीन ते १५ वर्षे वयोगटांतील एकूण १३ मुलांना ताब्यात घेऊन त्यांना बालगृहात पाठवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या अल्पवयीन मुलीसह ८ महिलांची सुटका

दलाल महिलेला अटक

मुंबई : मुलुंड येथील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये वाढदिवसाची पार्टी असल्याचे सांगून वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या एका अल्पवयीन मुलीसह ८ महिलांची मुलुंड पोलिसांनी सुटका केली आहे. या महिलांना वेश्याव्यवसाय करायला भाग पाडणाऱ्या दिव्यातील पूनम केदारे हिला मुलुंड पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार एक महिला फोनवर वेश्याव्यवसायासाठी महिला आणि अल्पवयीन मुलींचा पुरवठा करण्याचे संभाषण करत असल्याची माहिती मुलुंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आदिनाथ गावडे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गावडे यांनी बोगस ग्राहकामार्फत या महिलेशी संपर्क साधला. तेव्हा ३ एप्रिल रोजी ही महिला मुलुंड पश्चिम चेकनाका येथील एका प्रसिद्ध हॉटेलमध्ये काही महिला आणि अल्पवयीन मुलींना वेश्यागमनासाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पोलीस निरीक्षक गावडे यांनी आपल्या पथकासह सापळा रचून एक अल्पवयीन मुलगी आणि ८ महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता पूनम केदारे या महिलेने वाढदिवसाची पार्टी असल्याचे सांगून त्यांना या ठिकाणी आणले आणि पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले, अशी माहिती समोर आली. पोलिसांनी अल्पवयीन मुलीला मानखुर्द येथील महिला बालसुधार गृहात पाठवले, तर ८ महिलांची महिला सुधारगृहात रवानगी केली. मुलुंड पोलिसांनी याप्रकरणी पूनम केदारे या महिलेविरोधात पिटा कायदा, तसेच पॉस्कोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या २ आफ्रिकन महिला अटकेत

नवी मुंबई : खारघर पोलिसांनी बुधवारी रात्री खारघर सेक्टर-१२ मधील एका रो-हाऊसवर छापा मारून घरातून वेश्याव्यसाय चालवणाऱ्या दोन आफ्रिकन महिलांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी वेश्याव्यसायासाठी त्याठिकाणी बोलावण्यात आलेल्या ६ आफ्रिकन महिलांना ताब्यात घेऊन त्यांची न्यायालयाच्या आदेशानुसार सुधारगृहात रवानगी केली आहे. हा वेश्याव्यवसाय चालवणारी एक महिला फरार असून पोलिसांकडून तिचा शोध घेण्यात येत आहे.

खारघर सेक्टर-१२ मधील फिश सेंटरच्या बाजूला असलेल्या रो-हाऊसमध्ये लेमन नावाची आफ्रिकन महिला इतर दोन महिलांसह आपल्या घरातून वेश्याव्यसाय चालवत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ, पोलीस निरीक्षक अतुल आहेर (गुन्हे) व त्यांच्या पथकाने बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खातरजमा केली. यावेळी रो-हाऊसमध्ये वेश्याव्यवसाय चालवण्यात येत असल्याची खात्री पटल्यानंतर पोलिसांच्या पथकाने बुधवारी रात्री ९ च्या सुमारास तेथे छापा मारला.या वेळी रो-हाऊमध्ये वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या तीन आफ्रिकन महिलांविरोधात पिटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून त्यापैकी दोन महिलांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी वेश्यागमनासाठी त्याठिकाणी बोलावण्यात आलेल्या ६ आफ्रिकन महिलांना ताब्यात घेऊन न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांची सुधारगृहात रवानगी केली.

भोईवाडा अत्याचार प्रकरणात आरोपीला १० वर्षे कारावास

मुंबई : अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण करणाऱ्या तरुणाला दोषी ठरवत विशेष पॉक्सो न्यायालयाने त्याला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. तसेच आरोपीला १० हजार रुपयांचा दंड भरण्याचा आदेशही दिला आहे. सिद्धेश गडकरी असे या आरोपीचे नाव आहे. भोईवाडा परिसरात राहणाऱ्या एका पीडित मुलीच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर घरात कर्ता पुरुष नसल्याचा गैरफायदा घेत आरोपी सिद्धेशने जुलै ते ऑगस्ट २०१७ मध्ये पीडितेवर वारंवार जबरदस्तीने अत्याचार केले. त्याचे आक्षेपार्ह फोटोही इन्स्ट्राग्रामवर प्रसिद्ध केले. याबाबत कुठे वाच्यता केल्यास पीडितेला ठार मारण्याची धमकीही त्याने दिली.

अखेर पीडितेच्या आईने याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी १७ ऑक्टोबर २०१८ रोजी सिद्धेशला अटक केली. त्यानंतर चार महिन्यांत जामिनावर सुटलेल्या सिद्धेशच्या खटल्याची न्यायाधीश एस. सी. जाधव यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकील ॲड. वीणा शेलार यांनी सबळ पुराव्यांसह अनेक साक्षीदार तपासून सिद्धेशचे दोषत्व सिद्ध केले. त्याची गंभीर दखल घेत न्यायालयाने सिद्धेशला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

मुंबई विमानतळावर ४.८१ कोटींचे सोने जप्त

मुंबई : मुंबई सीमाशुल्क विभागाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या दोन दिवसांत ४.८१ कोटी किमतीचे ८.१ किलोपेक्षा जास्त सोने जप्त केले आणि ६ जणांना अटक केली. मुंबई सीमाशुल्क विभाग-३ च्या विमानतळ आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांनी शनिवार आणि रविवारी विमानतळावर उतरलेल्या प्रवाशांच्या विशिष्ट माहितीच्या आधारे ही कारवाई केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कपड्यांमध्ये आणि खासगी भागांमध्ये सोने लपवून ठेवलेल्या ६ प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. बारा वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये ४.८१ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ८.१ किलोपेक्षा जास्त सोने जप्त करण्यात आले आहे. तर दुसऱ्या प्रकरणात एका प्रवाशाने गुदद्वारात अंडाकृती कॅप्सुलमध्ये सोन्याचे मेण लपवले होते, तर आणखी एका प्रकरणात, प्रवाशाच्या शरीरावर सोन्याची चेन, रोडियम-प्लेटेड पेंडेंट आणि लॉकेट सापडले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

न्हावाशेवामध्ये ट्रेलर चालकांच्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू

चार जणांना अटक

नवी मुंबई : चोरी करण्यासाठी आलेल्या तरुणांना ट्रेलर चालकांनी लाथा बुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याने जखमी झालेल्या त्यातील एका तरुणाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. यानंतर न्हावाशेवा पोलिसांनी या तरुणाला मारहाण करणाऱ्या चौघा ट्रेलर चालकांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. ही घटना मागील ३ एप्रिल रोजी न्हावाशेवा येथील चांदणी चौकात घडली होती.

या घटनेतील मृत रौफ अकबर मोहम्मद खान (२०) हा त्याचे मित्र शाहरूख हुसेन खान व रोहन यांच्यासह ३ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजण्याच्या सुमारास जेएनपीटी येथील चांदणी चौक येथे उभ्या असलेल्या ट्रेलरमधून चोरी करण्यासाठी गेले होते. यावेळी ट्रेलरमध्ये झोपलेल्या चालकाला जाग आल्याने त्याने या तिघांना हटकले. यावरून त्यांच्यामध्ये वाद झाल्याने रोहन याने दगड मारून या ट्रेलरची काच फोडली. त्यामुळे चिडलेल्या ट्रेलर चालकाने त्याच्या इतर साथीदारांसह तिघांचा पाठलाग करत त्यांच्यापैकी रोहनला पकडून त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी त्याला सोडवण्यासाठी रौफ अकबर खान आला असता ६ ते ७ ट्रेलर चालकांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी एका ट्रेलर चालकाने त्याच्या डोक्यात लाकडी दांडक्याने जोरात फटका मारल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला प्रथम उरण येथील रुग्णालयात व नंतर मुंबईतील सायन हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान ६ एप्रिलला रौफ खान याचा मृत्यू झाला.

> चोरी करण्यासाठी गेलेले असताना ट्रेलर चालकांनी केलेल्या मारहाणीत रौफ खान हा जखमी झालेला असताना मित्रांनी चोरीचे बिंग फुटू नये, यासाठी रौफ खान हा मोटारसायकलवरून पडून जखमी झाल्याची माहिती पोलिसांना व रुग्णालयात डॉक्टरांना दिली होती. मात्र तीन दिवसांनंतर रौफ याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर त्याच्या मित्रांनी पोलिसांना खरी हकिकत सांगितली. त्यानंतर पोलिसांनी रौफ खान याला मारहाण करणाऱ्या ट्रेलर चालकांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.

ट्रेलर चालकांनी केलेल्या मारहाणीमुळे रौफचा मृत्यू झाल्याची तक्रार त्याच्या मित्राने केल्यानंतर न्हावाशेवा पोलिसांनी परवेश राजपत यादव (२६), घनशाम शिवकुमार मोर्या (२७), रविकुमार सुभेदार बिंद (२४) व पिंटू दयाशंकर यादव (३४) या चौघांना अटक केली आहे. न्यायालयाने या चौघांची १४ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी ठोठावल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी दिली.

अल्पवयीन मुलीचे अपहरण व बलात्कार करणाऱ्या नराधमाला पोलिसांकडून अटक

मुंबई : गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात १५ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी बिहारमधून एका व्यक्तीला अटक करण्यात आली. पोलिसांना आणि पीडितेच्या नातेवाईकांना शक्य असल्यास मला पकडून दाखवा, असे या ३० वर्षांच्या आरोपीने आव्हान दिले होते, अशी माहिती आरसीएफ पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्याने दिली. नरेश रामाशिष राय असे या आरोपीचे नाव आहे. नरेश हा सिमकार्ड बदलून नेपाळ तसेच दिल्ली, बिहार आणि काठमांडू येथे लपून बसला होता. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर, तिच्या नातेवाईकांनी पोलिसांशी संपर्क साधला. राय हा नजीकच्या कपड्याच्या कारखान्यात काम करतो व त्याचा थांगपत्ता लागत नसल्याचे चौकशीत आढळून आले. एक पथक बिहारमधील त्याच्या मूळ सीतामढी गावात गेले, पण तेथेही तो सापडला नाही. एका पथकाने पूर्वेकडील राज्याच्या अमितापुरा भागात दोन दिवस शोध घेतला आणि माधवपुरा सुस्ता येथून रायला पकडण्यात यश आले. मुलगी त्याच्यासोबत राहत असल्याचे आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. मुलीला तिच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. राय याच्यावर पॉस्को कायद्यांतर्गत अपहरण, बलात्कार आणि इतर गुन्ह्यांचा आरोप असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

एपीएमसीमध्ये इराणी व्यापाऱ्याला कोट्यवधींचा गंडा

आयात केलेल्या खजुराची रक्कम न देता केली फसवणूक



नवी मुंबई : एपीएमसी मार्केटमधील व्यापाऱ्यांनी इराणमधील खजुराच्या व्यापाऱ्यांकडून तब्बल २३ कंटेनर खजूर आयात करून त्या खजुराच्या बिलाची रक्कम न देता इराणमधील व्यापाऱ्यांची तब्बल ४ कोटी ३६ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या फसवणूक प्रकरणात सहभागी असलेल्या एपीएमसी मार्केटमधील फरीद तेली (६०), सादर तेली (३०), विरल शैलेशभाई तन्ना (३०), सुनीलकुमार (३०), देवकुमार ठक्कर ऊर्फ डी. के. (६०) या सहा व्यापाऱ्यांविरोधात फसवणुकीसह अपहार तसेच विश्वासघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

> या प्रकरणातील आरोपी व्यापाऱ्यांनी नबाब यांनी इराण देशातून पाठविलेला खजुराचा माल हा नबाब यांच्या कंपनीऐवजी दुबई येथील अल कबिरा जनरल ट्रेडिंग एलएलसी या कंपनीकडून भारतात आल्याचे भासवण्यासाठी भारतातील कस्टम विभागाकडे अल कबिरा जनरल ट्रेडिंग एलएलसी कंपनीच्या नावाची कागदपत्रे सादर केली होती. तसेच अल कबिरा जनरल ट्रेडिंग एलएलसी कंपनीला या खजुराच्या मालाचे पैसे पाठवून दिल्याचे दाखविण्यात आल्याचे आढळून आले आहे. त्यानंतर नबाब यांनी नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे धाव घेऊन तक्रार दाखल केली.

या प्रकरणातील तक्रारदार नबाब रुहुलाह अममिरजादे (४२) हे इराण देशातील खजुराचे मोठे निर्यातदार आहेत. मार्च २०१८ मध्ये ते पत्नीसह भारतात व्यापारासाठी आले असताना, त्यांनी एपीएमसी मार्केटमधील खजुराचे व्यापारी देवकुमार ठक्कर ऊर्फ डी. के. यांची भेट घेतली होती. त्यानंतर जून २०१९ मध्ये ठक्कर यांनी एपीएमसी मार्केटमधील तेली ट्रेडर्स या खजूर व्यापारी फरीद तेली व त्यांचा मुलगा सादर तेली यांच्यासह इराणमध्ये नबाब यांच्या फॅक्टरीमध्ये जाऊन भेट घेतली होती. तसेच त्यांच्यासोबत खजुराचा व्यापर करणाची इच्छा व्यक्त केली होती. त्यावेळी तेली पिता-पुत्रांनी विविध प्रकारच्या खजुराच्या मालाचे एकूण २७ कंटेनेरची ऑर्डर दिली होती.

त्यानुसार नबाब यांनी सप्टेंबर ते डिसेंबर २०१९ मध्ये फरीद तेली यांना न्हावाशेवा बंदरात २७ कंटेनर खजुराचा माल पाठवून दिला होता. त्यावेळी तेली पिता-पुत्रांनी सदर मालाची रक्कम नबाब यांना पाठवून दिली होती. त्यानंतर तेली पिता-पुत्रांनी जानेवारी २०२० मध्ये रमजान महिन्याच्या आनुषंगाने नबाब यांच्याकडून आणखी २३ कंटेनर खजूर आयात केले होते. त्यानुसार नबाब यांनी त्यांच्या अलिया अर्ग अरबियन कंपनीच्या माध्यमातून इराण येथील बंदरातून भारतात न्हावाशेवा बंदरात गॅलेक्सी एक्स्पोर्टस कंपनीच्या नावे १८ कंटेनर व वरायटी इम्पेक्स या कंपनीच्या नावाने ५ कंटेनर असा एकू ण २३ कंटेनर खजुराचा माल पाठवून दिला होता. नबाब यांनी तेली पिता-पुत्रांना २३ कंटेनर मालाचे पेमेंट करण्यासाठी सांगितले होते. मात्र कोव्हिडमुळे बंदर बंद असल्याचे सांगून पैसे पाठवून देण्यास टाळाटाळ केली होती. त्यामुळे नबाब यांनी मुंबईतील इराण येथील कॉन्स्युलेटमधील अधिकाऱ्यांकडे मदतीसाठी धाव घेतली. त्यावेळी कॉन्स्युलेटमधील अधिकाऱ्यांनी तेली पिता-पुत्र व नबाब यांची मीटिंग घडवून आणली. तसेच फरीद तेली यांना २ लाख यूएस डॉलरचे डिस्काऊंट देण्यास नबाब यांना सांगितले. पण तरीही त्यांना रक्कम मिळाली नाही.

सांगली एमडी ड्रग्ज प्रकरणात आता मुंबईतील आंगडियाला बेड्या

मुंबई : सांगलीतील कारखान्यात तयार केलेल्या मेफेड्रॉनच्या (एमडी) विक्रीतून आलेली रक्कम मुख्य आरोपी प्रवीण ऊर्फ नागेश रामचंद्र शिंदे (३४) याच्याकडे पोच करणाऱ्या आंगडियाला गुन्हे शाखेच्या कक्ष सातने बेड्या ठोकल्या आहेत. जेसाभाई मोटाभाई माली असे या आरोपीचे नाव आहे.

सांगली जिल्ह्यातील इरळी गावामध्ये ड्रग्जनिर्मिती करून देशभर त्याचे वितरण करणाऱ्या रॅकेटचा गुन्हे शाखेच्या कक्ष सातच्या पथकाने पर्दाफाश करत तब्बल २५२.२८ कोटींचे १२६.१४१ किलो ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) जप्त केले. गुन्हे शाखेने याप्रकरणी शिंदे याच्यासह दहा आरोपींना बेड्या ठोकल्या. यातील आरोपी शिंदे याने ड्रग्ज विक्रीतून कमावलेले तीन कोटी ४६ लाख ६८ हजार २०० रुपये त्याच्या भिवंडीतील एका मित्राच्या घरातून जप्त करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सापडल्याने गुन्हे शाखेने याचा माग काढला असता ड्रग्जची देश-विदेशात विक्री करून आलेली रक्कम हवालाच्या माध्यमातून ने-आण केली जात असल्याची माहिती समोर आली.

पुढील तपासात काळबादेवी येथील आंगडिया व्यावसायिक जेसाभाई हा ड्रग्ज विक्रीतील रक्कम शिंदेला पोच करत असल्याचे उघड झाले. जेसाभाईचा गुन्ह्यातील सहभाग समोर आल्याने गुन्हे शाखेने त्याला बेड्या ठोकल्या आहेत. न्यायालयाने जेसाभाईला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून गुन्हे शाखेचे अधिकारी हवाला रॅकेटच्या माध्यमातून पैशांची नेमकी देवाण-घेवाण कशी केली जात होती, ड्रग्ज विक्रीतून आलेली रक्कम कोणाकडे जमा केली आणि कोणाकडून पाठवली जात होती, याबाबत त्याची चौकशी करण्यात येत आहेत. गुन्हे शाखेने आतापर्यंत २५२.२८ कोटी रुपये किमतीचे १२६ किलो ६४१.५ ग्रॅम एमडी, २५.०७ ग्रॅम सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली स्कोडा कंपनीची कार आणि रोख तीन कोटी ६२ लाख ५६ हजार २०० रुपये जप्त केले आहेत.

तरुणीवर अत्याचार करून ठार मारण्याचा प्रयत्न

उरणमध्ये एक जण अटकेत

नवी मुंबई : उरण परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीने त्याच्या ओळखीतील २५ वर्षीय तरुणीचे फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे या आरोपीने सदर तरुणीच्या स्कूटीला मोटारसायकलने धडक देऊन तिच्यावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केल्याचेही उघडकीस आले आहे. उमेश सरोज (३६) असे या आरोपीचे नाव असून, उरण पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

या प्रकरणातील पीडित तरुणी व तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी उमेश सरोज या दोघांची गत तीन-चार वर्षांपूर्वी कामाच्या निमित्ताने ओळख झाली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये मैत्री वाढल्यानंतर आरोपी उमेश सरोज याचे पीडित तरुणीच्या घरी येणे-जाणे सुरू झाले होते. त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर आरोपी उमेश सरोज याने पीडित तरुणीसोबत काढलेले फोटो व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्यावर जबरदस्तीने अनेक वेळा लैंगिक अत्याचार केले. यादरम्यान आरोपी उमेश सरोज याने पीडित तरुणीकडून खर्चासाठी काही रक्कम सुद्धा घेतली. सदर रक्कम पीडित तरुणीने मागण्यास सुरुवात केल्यानंतर उमेशने तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली.

३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणी आपल्या स्कूटीवरून जात असताना, तिला मारून टाकण्याच्या उद्देशाने आरोपी उमेश सरोज याने पीडित तरुणीच्या स्कूटीला आपल्या मोटारसायकलची धडक दिली. पीडित तरुणी खाली पडल्यानंतर उमेशने तिच्यासोबत भांडण करून तिच्या डोक्यामध्ये लोखंडी रॉडने हल्ला करून पलायन केले होते. या हल्ल्यात पीडित तरुणी गंभीर जखमी झाल्याने तिच्या डोक्याला १० टाके पडले. पीडित तरुणीने रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर गत शनिवारी उरण पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी उमेश सरोज याला बलात्कार आणि जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अटक केली आहे. न्यायालयाने त्याची चार दिवसांच्या पोलीस कोठडीत रवानगी केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक अमोल खाडे यांनी दिली.

व्यापाऱ्याच्या ५५ लाखांच्या मालाचा अपहार; पिता-पुत्रास अटक

भिवंडी : 'बाप नंबरी बेटा दस नंबरी' या हिंदी चित्रपटाला शोभणारी हुबेहूब कथा भिवंडी शहरात घडल्याचे समोर आले आहे. मुंबईतील एका व्यापाऱ्याने त्याच परिसरात राहणाऱ्या त्याच्या अन्य दोघा साथीदार व्यापारी बापलेकावर विश्वासाने ५५ लाखांचा माल भाडेतत्त्वावर दिला असता दोघांनी मालाचा अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोघांवर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयंतीलाल देढीया व जयेश जयंतीलाल देढीया अशी गुन्हा दाखल झालेल्या बापलेकांची नावे असून, पोलिसांनी दोघांना बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार जिगर बिपीन शहा (४०, रा. गोरेगाव, मुंबई) यांचे वुड्स बॅगचा व्यवसाय आहे. आरोपित बापलेक हे मुलुंड पश्चिम भागात एका हायप्रोफाईल सोसायटीत राहतात. त्यांची ओळख तक्रारदार व्यापारी जिगर यांच्याशी मार्च २०२३ मध्ये झाली. या ओळखीतून बापलेकांनी जिगर शहा यांच्याशी 'बाप नंबरी बेटा दस नंबरी' चित्रपटासारखी चलाखी दाखवत व्यापारामध्ये भागीदारी करून विश्वास संपादन केला.

दरम्यान, व्यापारी जिगर बिपीन शहा याने त्याचे साथीदार व्यापारी आरोपी बापलेक यांच्याकडे भिवंडीतील राहनाळ येथील जयेश स्टोअरेज या ठिकाणी विश्वासाने ५५ लाख ३७ हजार ९०८ रुपये किमतीचा सिंथेटिक रबर वूड्स व नॅचरल रबर वूड्सच्या बॅगांचा माल सोपवला होता. मात्र त्यांनी मालाची आजतागायत परतफेड केलेली नाही. त्यामुळे याप्रकरणी व्यापारी जिगर यांच्या तक्रारीवरून ८ एप्रिल रोजी बापलेकाविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीस अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक रोहन शेलार यांच्याशी संपर्क साधला असता, दोघेही बापलेक सराईत गुन्हेगार असून दोघांवर ५ गुन्हे यापूर्वी विविध पोलीस ठाण्यात दाखल असून, त्यांना अटक करण्यात आली आहे. दोघे न्यायालयीन कोठडीत असल्याची त्यांनी माहिती दिली.

सोन्याच्या गुंतवणुकीवर आमिष दाखवून पावणेबारा कोटींची फसवणूक

मुंबई : ज्वेलर्स कंपनीतून खरेदी केलेले सोने ज्वेलर्स कंपनीत गुंतवल्यास ९ टक्के व्याजाने सोन्याच्या स्वरूपात परतावा देण्याचे आमिष दाखवून एका व्यवस्थापकीय संचालकाने दुसऱ्या व्यवस्थापकीय संचालकाची फसवणूक केल्याचा प्रकार मलबार हिलमध्ये समोर आला आहे. या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून मलबार हिल पोलीस अधिक तपास करत आहेत.

नेपियन्सी रोड परिसरात राहात असलेले ४९ वर्षीय तक्रारदार हे एका कंपनीमध्ये व्यवस्थापकीय संचालकपदावर असून, त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून खनिज तेल, धातू आयात-निर्यात तसेच विक्रीचा व्यवसाय चालतो. नाना चौक येथे कार्यालय असलेल्या ज्वेलरीचा व्यवसाय करणाऱ्या कंपनीत व्यवस्थापकीय संचालक असलेल्या अमित नाहेटा यांच्याशी तक्रारदार यांची ओळख झाली होती. तक्रारदार यांनी जून २०१७ मध्ये पत्नीच्या नावाने नाहेटा यांच्या कंपनीद्वारे सोन्याच्या विटा खरेदी केल्या होत्या. याच सोन्याच्या विटा नाहेटा याने त्यांच्या कंपनीमध्ये व्यवसायासाठी गुंतवण्यास सांगितले. गुंतवणुकीवर सोन्याच्या स्वरूपात अतिरिक्त सोने देण्याचे आमिष दाखवून नाहेटा याने ३ कोटी ५५ लाखांचे १२ हजार १२८ ग्रॅम सोने गुंतवणूक करण्यास भाग पाडले. पुढे त्याने ना सोन्याच्या स्वरूपात व्याज दिले, ना घेतलेले सोने परत केले. आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने तक्रारदार यांनी मलबार हिल पोलीस ठाणे गाठून नाहेटाविरोधात गुंतवणूक केलेले ६ कोटी ८२ लाख रुपये किमतीच्या १२ हजार १२८ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या विटा आणि त्यावर ९ टक्के व्याज म्हणून कबूल केलेल्या एकूण ४ कोटी ८९ लाख रुपये किमतीच्या ८ हजार ७०२ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या फसवणुकीची तक्रार दिली आहे.

वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्पावर पोलिसांचा छापा

नवी मुंबई : मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या नेरुळ सेक्टर - १३ मधील पायराईट्स स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने गुरुवारी सायंकाळी छापा मारुन स्पा मालक आणि चालक या दोघांना ताब्यात घेतले. तसेच मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसायासाठी ठेवण्यात आलेल्या दोन तरुणींची सुटका केली आहे.

नेरुळ सेक्टर-१३ येथील पायराइड्स स्पा व मसाज पार्लरमध्ये मसाज आणि स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवण्यात येत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे व त्यांच्या पथकाने गुरुवारी सायंकाळी नेरुळमधील पायराइड्स स्पामध्ये बनावट ग्राहक पाठवले होते. या वेळी या स्पामध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवण्यात येत असल्याची खात्री पटल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने या स्पावर छापा टाकला. त्यानंतर या स्पामध्ये वेश्याव्यवसायासाठी ठेवण्यात आलेल्या दोन तरुणींची सुटका केली. सदर स्पाचा मॅनेजर दीपक शर्मा व अरुण सरवटा या दोघांवर पीटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून दोघांना ताब्यात घेतले आहे.

सदर स्पा चालक हे झोपडपट्टी भागात राहणाऱ्या २० ते २५ वयोगटातील गरजवंत महिला व तरुणींना हेरून त्यांना मसाज करण्याच्या बहाण्याने कामाला ठेवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे तपासात आढळून आले आहे. तसेच ते ग्राहकांकडून वेश्यागमनाचे ५ हजार रुपये घेऊन संबंधित महिला, तरुणींना २ हजार रुपये देऊन उर्वरित ३ हजार रुपये स्वतः घेत असल्याचे देखील तपासात आढळून आले आहे. गेल्या काही महिन्यांपासून या स्पामध्ये सदरचा कुंटणखाना सुरू असल्याचे आढळून आले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. व.वि.श.म /क.वि/५९०/२०२३-२४
दिनांक -०८-०४-२०२४

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्र.	रिसीट नं.	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-७	NL३०/२०४	६६७५	नसीर अब्दूल शेख	फैजल नसीर शेख
२	निळेमोरे-७	NL३०/२०२	६६७४	नसीर अब्दूल शेख	अफजल नसीर शेख
३	निळेमोरे-७	NL३०/१६२/२८	६५८३	सुहास घनश्याम नाईक	अमीत कुमार अमरदेव सिंह/नुतन अमित सिंह
४	निळेमोरे-७	NL३०/३७५/५	६५७३	सिध्दी विनायक कंस्ट्रक्शन कंपनी	सिध्देश दशरथ मोरे / स्वाती सिध्देश मोरे
५	निळेमोरे-५	NL२८/१२/७८	६६७८	अरविंद आर सावंत	सचिन भाऊ सकपाल
६	निळेमोरे-५	NL२८/७८/१२३	६५८७	वसंत बाळु पाटोळे	अरुन कुमार ओगडमलजी परमार / मिलन परपार
७	निळेमोरे-५	NL२८/१०६/६०	६७१८	ए. के. मेहता	हामिरा काना जारू व शम्मी हामीर जारू
८	निळेमोरे-५	NL२८/५०/३५	६७४७	डॉम्नीक कोलासो	समीर मोहन श्रीवास्तव
९	निळेमोरे-५	NL२८/१०६/२०५	६७९८	ए. के. मेहता	संदिपकुमार रामतिलक गुप्ता व खुशबु संदिपकुमार गुप्ता / सुनीता
१०	निळेमोरे-५	NL२८/१९/४	६७३५	विजय धागीया	सुचना बांध्योपाध्याय /चंदन राम प्रसाद बांध्योपाध्याय
११	निळेमोरे-५	NL२८/४८/३	६७३७	वाल्मीकी जगफुल सिंह	सुचना बांध्योपाध्याय /चंदन राम प्रसाद बांध्योपाध्याय
१२	निळेमोरे-७	NL३०/१६५/२३	६७८८	प्रभाकर सहादेव आचरेकर व सिमा प्रभाकर आचरेकर	प्रशांत दिलीप मेस्त्री / ममता नारायण मिस्त्री
१३	निळेमोरे-७	NL३०/३३६/१३	६६५७	साईधारा इंटरप्राईजेस	निर्मला पांडुरंग शिगवन
१४	निळेमोरे-७	NL३०/२७५/३	६६५९	सुनिता एन रुपारेलीया	मोहम्मद तालीब अंसारी
१५	निळेमोरे-७	NL३०/३४१/३०	६६६५	सुनिल गडकरी	आशा शैलेश मेहता / शैलेश हंजारीमल मेहता
१६	निळेमोरे-७	NL३०/३४६/६	६६६१	चितादेवी आर यादव व संतोष यादव	अम्बर श्रीवानी
१७	निळेमोरे-७	NL३०३१६/५७	६७२९	चंदन एस डे	विधी विलास कुंभार
१८	निळेमोरे-७	NL३०/३१६/९	६६६३	लिना महेश पटेल	साई संतोष एडके
१९	निळेमोरे-६	NL२९/१०३/१७	६७३१	उदय वसंत जाधव	दिलीप आर तिवारी
२०	निळेमोरे-६	NL२९/१६०/१७८	६७३३	साई जिवदानी इंटरप्राईजेस	विपुल नथुराम दळवी व तेजस्वी विपुल दळवी
२१	सोपारा-१	NL३१/४८/३	६८०२	जगदिश ठाकूर	संजयकुमार गितलाल कनोजिया

सही/-

(निता कोरे)
प्र. सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा



संपादकीय

दहशतवादाचा 'अर्थ'

संपादक दिपक मोरेश्वर नाईक

दहशतवादाचा टोकाचा, अतिरेकी प्रकार म्हणजे युद्ध. त्यात व्यग्र असलेल्या पुतीन यांच्या रशियावर स्वतःस 'इस्लामिक स्टेट' (आयएस) म्हणवून घेणाऱ्या दहशतवादी गटाने केलेल्या भीषण हल्ल्याने सगळे जग हादरले. तो एक वेगळाच प्रतिसाद म्हणावयास हवा. गेल्या काही वर्षांत जगात याहून भीषण हत्याकांडे झालेली आहेत. अमेरिकेतील शाळा-महाविद्यालयांत 'मास किलिंग' म्हणतात तसे प्रकार अधूनमधून पाहावयास मिळतात. तिकडे युक्रेन आणि रशियात क्षेपणास्त्रे, बॉम्ब आणि बंदुकीच्या गोळ्यांना रोजच अनेक लोक बळी पडत आहेत. सीरियातील युद्धास जग जणू विसरून गेले आहे. पण, ते सुरू आहे आणि तेथेही माणसे मरत आहेत. जगभरात ठिकठिकाणी दहशतवादी हल्ले होतच आहेत. कोण कुठले चार दहशतवादी येतात, अंदाधुंद गोळीबार करतात, समोर येईल त्याला टिपतात, स्फोट घडवून आणतात आणि जमल्यास पळून जातात, असे घडतच आहे. अधूनमधून झुंडबळी जात आहेत. आणि या सगळ्याकडे 'रोज मरे त्यास कोण रडे' या प्रकारे जगाचे दुर्लक्ष झाले आहे. एकंदरच हिंसाचाराचे सामान्यीकरण-नॉर्मलायझेशन झालेले आहे. सिनेमातील दृश्ये पाहावीत तेवढ्या आवडीने लोक प्रत्यक्षातील हिंसक घटनांचे 'रील्स' पाहताना दिसत आहेत. अशी परिस्थिती असताना, मॉस्कोत 'आयएस-के'ने केलेल्या हल्ल्याने संपूर्ण जग हादरल्यासारखे झाले. याची अनेक कारणे सांगता येतील.

तो हल्ला पुतीन यांच्या रशियात झाला, हे त्यापैकी एक. हुकुमशाही देशांत असे काही घडावे हे काहीसे आक्रितच! त्यात तो देश युद्धमग्न. म्हटल्यावर तेथील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक असणार. असे असतानाही दहशतवादी हा हल्ला करू शकले. हे आश्चर्यकारकच. त्याची जबाबदारी पुतीन यांनी तातडीने युक्रेनच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला. तो शत्रूराष्ट्राने प्रायोजित केलेला हल्ला असल्याचे त्यांचे म्हणणे. ते हास्यास्पदच होते. पण पुतीन यांचा तो आरोप जगासाठी नव्हताच. तो रशियन नागरिकांसाठीचा प्रोपगंडा होता. तो त्यांच्यापर्यंत नीटच पोचला. त्यातून युक्रेनविरोधातील भावना अधिक भडकावणे आणि सुरक्षा व्यवस्थेवरील टीकेचे टोक बोथट करणे हे दोन हेतू त्यांनी साध्य केले. पण सर्वांना धक्का बसण्याचे याहून मोठे कारण म्हणजे 'इस्लामिक स्टेट' नावाचे भूत अजून जागे तर आहेच; पण ते केवळ मध्य पूर्वेतच नव्हे, तर पाश्चात्त्य जगतातही उत्पात घडवू शकते, हे पुन्हा एकदा या हल्ल्याने स्पष्ट केले. आणि त्याच बरोबर धर्माधिष्ठित दहशतवादाचा फणा ठेचणे किती अवघड असते, याची प्रचितीही पुन्हा एकदा दिली. ओसामा बिन लादेनच्या अल-कायदाची शकले उडाल्यानंतर जग जिहादी दहशतवादापासून मुक्त होईल, असा अनेकांचा समज होता. तो खोटा ठरला. अल-कायदा नामशेष होता होता तिकडे 'आयसिल'ची 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड लेवान्त'ची निर्मिती झाली. या संघटनेने वारंवार आपले लक्ष्य बदलले आहे. 'आयसिल'ची नंतर 'आयसिस' झाली. आता इराक आणि सीरिया हे तिचे भौगोलिक लक्ष्य बनले आणि आता ती 'आयएस' झाली आहे. म्हणजे 'इस्लामिक स्टेट'. संपूर्ण जगात खिलाफत स्थापन करणे हे तिचे आताचे ध्येय आहे. ते अशक्यप्राय तर आहेच; पण त्याचा अर्थही प्रचंड धूसर आहे. परंतु, एकदा धर्माची अफू डोक्यात गेली की तेथे तर्क काम करीत नाही. या ध्येयाने प्रेरित होऊन या दहशतवाद्यांनी इराक, सीरियाचा मोठा भाग प्रारंभी ताब्यात घेतला. 'टिकणे आणि वाढणे' हे तिचे घोषवाक्य. पण तेही अशक्य. अमेरिका आणि रशियाच्या नेतृत्वाखालील फौजांनी तिचे बारा वाजवले. आयएस-खोरासन हा तिचाच एक तुकडा. इराण, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानात कारवाया करणाऱ्या या गटानेच आताचा हा रशियातील हल्ला केला. युरोपात आपले दहशतवादी जाळे पसरवण्याचे तिचे प्रयत्न सुरू आहेत. यातून ती तिचे धर्मराष्ट्राच्या स्थापनेचे ध्येय कसे साध्य करणार, हा प्रश्नच आहे. जगाच्या इतिहासाने हे दाखवून दिलेले आहे की, कोणत्याही दहशतवादी कारवायांनी कोणासही ना स्वातंत्र्य मिळवून दिले आहे, ना धर्मराष्ट्र स्थापन करता आले आहे. ज्यांना वाटते की, बॉम्ब फोडून आणि हत्या करून स्वातंत्र्य मिळवता येते, ते मूर्खांच्या नंदनवनात राहत असतात. त्यासाठी लोकांतून उठाव करावा लागतो. याचे साधे कारण हे की, कोणत्याही दहशतवादी संघटनांपेक्षा राज्य नावाच्या यंत्रणेत प्रचंड दंडक्षमता असते. जोवर सत्ताधीशांची नैतिक वैधता नष्ट होत नाही, तोवर सत्ता पालटणे कठीण असते. हे तिकडे श्रीलंकेत एलटीटीने अनुभवले आहे, आपल्याकडचे नक्षली अनुभवत आहेत. आयएसलाही हा धडा मिळालेला आहे आणि आता तिच्या या अशा कारवाया सुरू आहेत. प्रश्न असा, की यातून नेमके काय साध्य होणार? आपल्यावर वा आपल्या समाजावर अन्याय, अत्याचार होतात, आपले न्याय्य हक्क डावलले जातात, आपली धार्मिक वा सामाजिक वा सांस्कृतिक ओळख वा अस्मिता मिटविण्याचे प्रयत्न केले जातात अशा प्रकारच्या भावनांतून निर्माण झालेल्या संतापातून अनेकदा दहशतवाद उगवतो. तो राजकीय स्वरूपाचा असो वा धार्मिक, तेथे नेहमीच 'ते' विरुद्ध 'आपण' असा संघर्ष असतो. हा संघर्ष जेवढा पेटता, तेवढा दहशतवादास मिळणारा पाठिंबा अधिक असे ते गणित असते. निरपराध नागरिकांना दहशतवादी हल्ल्यांतून, दंगलींतून वगैरे मारले की या संघर्षाची आग अधिक भडकते. तिकडून जोराचा प्रतिकार सुरू होतो. त्यातून अन्याय, अत्याचार होतात. हे तिकडच्या आणि इकडच्या अशा दोन्ही अतिरेकी/दहशतवादी संघटनांच्या फायद्याचेच... अखेर दहशतीचा नाच कोणाच्याही नावाने केलेला असला, तरी त्यात अंतिमतः मूठभरांच्या सत्तेचा आणि पैशांचाच खेळ असतो. कोणत्याही अतिरेकाचा/दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल, तर त्याचा हा 'अर्थ' नीट लक्षात घेतला पाहिजे.

पुतीन यांच्या विजयाचा अन्वयार्थ

रशियाच्या अध्यक्षपदी पुतीन यांची फेरनिवड ही बाब रशियाच्या राजकीय प्रकृतीस अनुसरून आहे. त्यांच्या कार्यकाळात आता युक्रेन युद्ध थांबावे. युरोपात व जगात शांतता नांदावी. म्हणून भारताने पुढाकार घेऊन युक्रेनचा प्रश्न सोडविला तर पुतीन शांतिदूत बनू शकतील. पण इतिहासात 'जर तर'ला फारसे स्थान नसते.

रशियन संघराज्याच्या अध्यक्षपदी ८७ टक्के मते मिळवून व्लादिमीर पुतीन पुन्हा निवडून आले. पुतीन यांनी १९९९ पासून अध्यक्ष किंवा पंतप्रधान म्हणून सातत्याने राजकीय पदे भूषविली आहेत. १९९९ ते २००० आणि २००८ ते २०१२ पर्यंत ते पंतप्रधान पदावर विराजमान होते. २००० ते २००८ आणि २०१२ पासून ते सातत्याने अध्यक्ष म्हणून आजपर्यंत सिंहासनावर आरूढ आहेत. रशियामध्ये जोसेफ स्टॅलिनपासून आजपर्यंत सर्वाधिक काळ सत्तेवर राहिलेले अध्यक्ष असा त्यांनी नवा विक्रम नोंदविला आहे. लष्करप्रमुख, हुकूमशहा, आक्रमक नेता, लोकशाहीचा कर्दनकाळ अशी त्यांच्यावर टीका केली जात असली तरीही मजबूत रशियाचा महानायक म्हणून त्यांची कामगिरी कोणालाही पुसता येणार नाही. दिमित्री मेदवेदेव यांच्या तालमीत तयार झालेले पुतीन हे अत्यंत चतुर, मुत्सद्दी असून बोरिस येल्त्सिन यांच्या नंतर ते रशियाचे सर्वाधिक प्रभावी नेते बनले आहेत. आशिया व युरोप खंडातील म्हणजे युरेशियातील सर्वांत मोठा भूप्रदेश असलेला हा ऐतिहासिक देश नेहमीच सर्वंकष सत्ताकेंद्रवादाकडे झुकलेला दिसतो. पूर्वीची डावी आणि आत्ताची उजवी विचारसरणी यामध्ये अंशात्मक फरक असला तरी सर्वंकष सत्तावाद हे तेथील राजकारणाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्याची प्रचिती सध्याच्या निवडणुकीने आली आणि आता सहा वर्षे पुतीन रशियाचे सर्वेसर्वा बनले आहेत.

नव्या युगाचा घंटानाद : आपल्या प्रतिस्पर्ध्याला चीतपट करून व्लादिमीर पुतीन यांची सहाव्यांदा झालेली निवड ही त्यांच्या नव्या कारकीर्दीचा आरंभीचा घंटानाद आहे. नव्या नाटकाचा अंक सुरू झाला आहे आणि आता पुढील सहा वर्षे हे नाट्य रंगणार आहे. ही राजवट किती यशस्वी होईल, पुतीन खरोखरच रशियाला पुन्हा महान राष्ट्र बनवणार काय, असे अनेक प्रश्न यातून उभे राहतात. पुतीन यांचे दोन नजीकचे प्रतिस्पर्धी एक कम्युनिस्ट आणि दुसरे तरुण विरोधक हे २४ टक्के व त्याहीपेक्षा कमी मते मिळवून पराभूत झाले आहेत. पुतीन यांच्या विरोधातले बेगडी नाट्य आता संपले आहे आणि सहा वर्षांची त्यांची नवी राजवट सुरू झाली आहे. स्टॅलिन यांनी ज्या पद्धतीने रशियावर दीर्घकाळ राज्य केले त्या पद्धतीने पुतीन पोलादी पडद्याचे राजकारण करत आहेत.

पुतीन हे केजीबी या सोव्हिएट रशियाच्या गुप्तचर खात्याचे १६ वर्षे म्हणजे सव्वा तप श्रेष्ठ पदावर पीटर्सबर्ग येथे काम करत होते. १९९१ मध्ये राजीनामा देण्यापूर्वी ते लेफ्टनंट कर्नल या हुद्द्यावर पोहोचले होते. १९९६ मध्ये रशियात हा तारा उदयास आला. बोरिस येल्त्सिन यांच्या प्रशासनात सामील होण्यासाठी ते मॉस्कोत पोहोचले. पंतप्रधान होण्यापूर्वी ते फेडरल सिक्युरिटी सर्व्हिस म्हणजे सुरक्षा विभागाचे संचालक होते. पुढे त्यांना सचिव म्हणून बढती मिळाली. येल्त्सिन यांच्या राजीनाम्यानंतर पुतीन कार्यकारी अध्यक्ष बनले. चार महिन्यांपेक्षा कमी कालावधीत ते अध्यक्ष बनले आणि पहिल्या सत्रासाठी निवडून आले. त्यानंतर २००४ मध्ये त्यांची पुन्हा निवड झाली. सतत दोन वेळा राष्ट्रपती पदाच्या घटनात्मक मर्यादांमुळे ते २००८ ते २०१२ पर्यंत दिमित्री मेदवेदेव यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा पंतप्रधान बनले. २०१२ मध्ये अनेक आरोप होऊनही ते पुन्हा निवडून आले व २०१८ मध्ये त्यांनी हा विजयाचा विक्रम कायम ठेवला आणि आता २०२४ मध्ये ते पुन्हा निवडून आले.

या काळात रशियाची अर्थव्यवस्था दरवर्षी सात टक्क्यांनी वाढली. आर्थिक सुधारणांचा वेग, विपुल तेलसाठा व शुद्धिकरण या बळावर मध्य-पूर्वेतील देशापेक्षाही तेलाचे अधिक उत्पादन करून त्यांनी रशियाला बळकट केले. तेलाच्या किमतीत पाचपट वाढ झाली. याचा फायदा रशियाने घेतला. भारताला मात्र एक सच्चा मित्र म्हणून त्यांनी माफक दरात कच्च्या तेलाचा पुरवठा केला.

आपल्या काळात त्यांनी चेचेन बंडखोरांचा बंदोबस्त केला आणि फुटीरतावाद्यांना नमविले. जॉर्जियाविरुद्धचा लष्करी संघर्ष त्यांनी यशस्वी केला. पोलीस व गृह खात्यात आमूलाग्र बदल केले. तिसऱ्या अध्यक्षीय काळात क्रिमिया हा भूराजनैतिक दृष्टीने महत्त्वाचा प्रदेश रशियाला जोडला. तसेच, त्यांनी पूर्व युक्रेनचा प्रदेशही मिळविला. सीरियाच्या गृहयुद्धामध्ये बशर अल यांना पाठिंबा दिला. पूर्व भूमध्य सागरातील राष्ट्रांचा पाठिंबा मिळविला व तेथे रशियाचे कायमस्वरूपी नाविक तळ प्रस्थापित केले.

चौथ्या अध्यक्षीय कारकिर्दीत २४ फेब्रुवारी २०२२ ला त्यांनी युक्रेनवर आक्रमण केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिका व युरोपीय राष्ट्रे निषेध करू लागली. आर्थिक निर्बंधही लादण्यात आले. तेव्हा त्यांनी चीन व मध्य पूर्वेतील राष्ट्रांच्या मदतीने आपली अर्थव्यवस्था सुधारली. मार्च २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने युद्ध गुन्ह्याखाली लहान मुलांचा छळ व अन्य कारणावरून पकड वॉरंट जारी केले. पण पुतीन डगमगले नाहीत. तथाकथित गुन्हेगारीचे आरोप त्यांनी नाकारले. २०२१ मध्ये घटना दुरुस्ती करून दोन सत्रांनंतर पुन्हा निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार मिळविला. त्यामुळे मार्च २०२४ मध्ये ते हा नवा विक्रम करू शकले. रशियाची सत्ताकेंद्री राज्यव्यवस्था जगामध्ये वादाचा विषय ठरली. मानवी हक्कांचे उल्लंघन, विरोधकांना तुरुंगवास, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी, निःपक्ष निवडणुकीचा अभाव इत्यादी आरोप त्यांच्यावर केले जातात. जगातील चार अभिव्यक्तिवादी संघटनांनी त्यांच्यावर लोकशाहीविरोधक असल्याचे आरोप केले आहेत. खरे तर, तसे आरोप पूर्वीच्या साम्यवादी राजवटीवर पण होत होते.

नव्या सत्रातील आव्हाने : मार्च २०२४ मध्ये नव्याने सुरू झालेल्या सहाव्या कालखंडात रशियामध्ये पुतीन आता यापुढे सत्तेचे केंद्रीकरण करतील आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करतील अशी भीती अनेकांना वाटत आहे. पुतीन यांच्या नव्या राजकीय कारकिर्दीत कोणते महत्त्वाचे बदल घडतील, याविषयी अभ्यासकांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. पुतीन यांच्या भावी काळात पुढील पाच गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्याव्या लागतील. पहिले म्हणजे पुतीन यांनी रशियाची ऊर्जाशक्ती मजबूत केली आहे. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, व्यापार या क्षेत्रामध्ये रशियाचे महत्त्व वाढविले आहे. त्यांनी ऊर्जा क्षेत्रामध्ये रशियाला जगात पहिल्या क्रमांकावर आणून ठेवले आहे आणि स्वतःच्या ताकदीवर सर्व मध्य पूर्वेतील राष्ट्रांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले आहे. पुतीन यांच्या कार्यकिर्दीतील हा एक नवा अध्याय आहे.

अधिकृत बांधकामावर कारवाई टळण्यासाठी लाच मागणारे गजाआड

मुंबई : अधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी २० लाखांची मागणी करून समाजसेवकाच्या मदतीने लाचेच्या रकमेचा ८ लाख रुपयांचा पहिला हफ्ता घेणारे मुंबई महानगरपालिकेचे दोन लाचखोर अभियंते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात सापडले आहेत. मंगेश कांबळी (३७) आणि सुरज पवार (४३) अशी या अभियंत्यांची नावे आहेत.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, यातील तक्रारदार हे दक्षिण मुंबईतील रहिवाशी आहेत. त्यांच्या भागीदारीमध्ये असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर अनधिकृत बांधकाम आणि शेड बांधण्यात आली आहे. ही इमारत मुंबई महानगरपालिकेच्या सी वॉर्डच्या अंतर्गत येते. वार्ड कार्यालयातील इमारत आणि कारखाने विभागाने संबंधित बांधकामावर निष्काशनाची कारवाई करण्यासाठी नोटीस बजावली. या नोटिसीनंतर तक्रारदार यांनी वार्ड कार्यालय गाठले असता, कनिष्ठ अभियंता मंगेश कांबळी आणि दुय्यम अभियंता सुरज पवार यांनी अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई न करण्यासाठी त्यांच्याकडे २० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. एवढ्या मोठ्या रकमेची मागणी झाल्याने तक्रारदार यांनी गुरुवारी एसीबीच्या मुख्यालयात जात तक्रार दिली. त्यानुसार, एसीबीच्या पथकाने केलेल्या पडताळणीमध्ये कांबळी आणि पवार हे इमारतीच्या छतावरील शेडवर कारवाई न करण्यासाठी १५ लाख आणि पाचव्या मजल्यावरील अनधिकृत कामावर कारवाई न करण्यासाठी ५ लाख अशी एकूण २० लाख रुपयांची लाचेची मागणी करत असल्याचे स्पष्ट झाले. एसीबीने तक्रारदार यांच्या मदतीने सापळा रचला. कांबळी आणि पवार यांनी लाचेची रक्कम चंदनवाडीतील समाजसेवक नीलेश होडार याच्याकडे देण्यास सांगितले. त्यानुसार, तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीने होडारला रंगेहाथ पकडले. या प्रकरणी कांबळी आणि पवार यांच्यासह होडारविरोधात गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू असल्याचे एसीबीने सांगितले.

खेळण्यातील नोटा देऊन रचला सापळा

पालिकेतील अभियंते मंगेश कांबळी आणि सुरज पवार यांनी २० लाखांची मागणी करून ८ लाख रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारण्याची कबुली दिल्यानंतर एसीबीने सापळा रचला. ८ लाख रुपये रकमेमध्ये ५०० रुपये किमतीच्या २०० खऱ्या नोटा आणि ५०० रुपयांच्या खेळण्यातील १ हजार ४०० नोटा देऊन लाचखोरांवर कारवाई केली.

ॲण्टॉप हिलमध्ये गुन्हेगार मित्रावर गोळीबार

मुंबई : पैशांच्या देवाण-घेवाणीवरून झालेल्या वादानंतर शनिवारी सकाळी एका गुन्हेगाराने त्याच्या गुन्हेगार मित्रावर गोळ्या झाडल्याची घटना ॲन्टॉप हिलमध्ये घडली. या हल्ल्यात आकाश कदम ऊर्फ स्वामी हा गुन्हेगार जखमी झाला असून, त्याच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस अभिलेखवरील आरोपी असलेला आकाश हा धोबीघाट येथे वास्तव्यास होता. तो सध्या ॲण्टॉप हिलमधील नवतरुण नाईक नगरमध्ये राहायला आला होता. आरोपी विवेक शेट्टीयार (४०) या गुन्हेगार मित्रासोबत त्याचा पैशांच्या देवाण-घेवाणीवरून वाद झाला होता. शनिवारी पहाटे पाचच्या सुमारास विवेकने आकाशच्या घरी जात त्याच्यावर गोळ्या झाडल्या. पोटात गोळी लागून आकाश जमिनीवर कोसळताच विवेकने तेथून पळ काढला. गोळीबाराच्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. जखमी अवस्थेतील आकाशला स्थानिकांनी उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल केले. घटनेची वर्दी मिळताच स्थानिक ॲण्टॉप हिल पोलिसांसह गुन्हे शाखेच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. आकाशच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून, ॲण्टॉप हिल पोलिसांनी या प्रकरणी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांनी गुन्हे प्रकटीकरणची वेगवेगळी ८ पथके तयार केली आहेत. तसेच, गुन्हे शाखेची पथकेसुद्धा आरोपीचा शोध घेत आहेत.

भिवंडीतील आगीत २० गोदाम जळून खाक

भिवंडी : मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील वाहुली गावाच्या हद्दीत असलेल्या पत्र्याच्या मदतीने बनवण्यात आलेल्या गोदामांना सोमवारी मध्यरात्री भीषण आग लागण्याची घटना घडली.

आगीने रौद्र रूप धारण केल्याने सुमारे २० गोदाम जळून खाक झाली आहेत. पडघा पोलिसांनी आगीची माहिती दिल्याने भिवंडी व कल्याण अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल होत जवानांनी आग आठ तासांत नियंत्रणात आणली. ग्रामीण भाग असल्याने आग विझवण्यासाठी पाण्याची कमतरता भासत असल्याने मंगळवारी सकाळी ८ पर्यंत आग धुमसत होती. आगीचे कारण अस्पष्ट आहे. कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांना शर्थ करावी लागली. पोलिसांनी या घटनेची नोंद घेऊन तपास सुरू केला आहे.



सफरचंद आणि केळी

खाण्याची योग्य वेळ

फळांचे सेवन करणे आमच्या आरोग्यासाठी उत्तम ठरतं, कारण याने कमजोरी दूर होते. तसेच आजारी पडल्यावर डॉक्टर्सदेखील फळं खाण्याचा सल्ला देतात. फळं खायचा हा विचार करून अनेक लोकं दिवसातून कधीही फळांचे सेवन करतात, परंतु असे करणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरू शकतं. तर जाणून घ्या योग्य वेळ -

सकाळी नाश्ता करताना सफरचंद खाणे सर्वात योग्य ठरेल. यात पेक्टिन नामक तत्त्व आढळतं ज्यामुळे बीपी लेव्हल लो होतं आणि कोलेस्टरॉल कमी करण्यातदेखील मदत करतं. सफरचंद रात्री खाणे टाळावे कारण हे पचण्यास कठीण जाते आणि याने ॲसिडीटीचा त्रास उद्‌भवू शकतो.

तसेच केळी खाण्याची योग्य वेळ सांगायची तर दुपारच्या जेवण्यानंतर. याने शरीरातील रोग प्रतिकारशक्ती वाढते. रात्री केळी खाण्याने पचण्यात त्रास होतो.

तसेच बटाटा किंवा बटाट्याचे पदार्थ खाण्याची इच्छा असल्यास ब्रेकफास्ट ही वेळ सर्वात उत्तम आहे. कारण यातील हाय कॅलरीज. रात्री याचे सेवन केल्याने गॅसची समस्या आणि लठ्ठपणा वेगाने वाढू शकतो.

आता प्रश्न हा आहे की रात्री काय सेवन करू शकतो तर दूध पिण्यासाठी रात्रीची वेळ योग्य आहे. याने चांगली झोप येते. तरी आपण व्यायाम करत असाल तर सकाळी दूध पिणे योग्य ठरेल.

रंगाला अनुसरून करा मेकअप

गोऱ्या रंगासाठी

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हेवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूफ शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.

गडद रंगाच्या त्वचेसाठी

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरेमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.

पिवळ्या रंगाची त्वचा

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.

गव्हाळ त्वचेसाठी

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्यूटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरूम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

वजन कमी करण्यासाठी 'ही' पेये आहेत उपयुक्त

वजन कमी करायचे तर हे खा, ते करा असे सल्ले लठ्ठ व्यक्तींना सातत्याने देण्यात येतात. यामध्ये आहारतज्ज्ञांबरोबरच घरातील व्यक्ती आणि मित्रमंडळीही पुढे असतात. मात्र काही पेयांमुळेही वाढलेले वजन कमी होण्यास मदत होते. त्यामुळे हे सोपे उपाय वेळीच जाणून घेणे अतिशय गरजेचे आहे. या पेयांचा रोजच्या आहारात समावेश केल्यास शरीरावर वाढलेली अनावश्यक चरबी कमी होण्यासाठी त्याचा उपयोग होतो. पाहूयात काय आहेत हे उपाय...

पाणी

आरोग्याला सर्वात फायदेशीर कोणते पेय असेल तर ते म्हणजे पाणी. पाण्याला जीवन म्हटले जाते ते खरेच आहे. दिवसभरात जास्तीत जास्त पाणी पिणे आवश्यक असते. यामुळे अनेक शारीरिक अडचणींपासून सुटका होते. यामध्ये थोड्या प्रमाणात लिंबू पिळल्यास तेही फायदेशीर ठरू शकते.

व्हेजिटेबल सूप

जंकफूड खाण्याऐवजी व्हेजिटेबल सूप घेणे वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर ठरते. यामुळे आपण आहारातून घेत असलेल्या कॅलरीज कमी होण्यासही मदत होते. तसेच सर्व भाज्या शरीरात जातात ज्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असतात.

ग्रीन टी

ग्रीन टी आरोग्यदायी असतो असे म्हटले जाते मात्र तो कधी आणि कसा घ्यावा याचेही काही नियम आहेत. ते पाळून ग्रीन टी घेतल्यास तो अतिशय उपयुक्त ठरू शकतो. शरीरातील ग्लुकोज आणि साखर कमी करण्यासाठी ग्रीन टीचा उपयोग होतो. त्यामुळे शरीरातील फॅट्स जळण्यासही मदत होते आणि ग्रीन टी हा वजन करण्याचा उत्तम उपाय ठरतो.

काळी कॉफी

शरीरातील फॅटस बर्न करण्यासाठी आणि मेटाबॉलिझम चांगला रहावा यासाठी काळी कॉफी अतिशय उपयुक्त असते. आपण ज्यावेळी आराम करतो त्यावेळी या कॉफीतील कॅफेन हा पदार्थ फॅट्स बर्न करण्याचे काम करतो. त्यामुळे तुम्हाला चहा किंवा कॉफी घेण्याची इच्छा झाल्यास काळी कॉफी घेणे हा अतिशय उत्तम उपाय ठरु शकतो.

स्कीम्ड मिल्क

दूध हे आरोग्यासाठी कायमच चांगले असते. मात्र त्यातील स्निग्धांश कमी करून हे दूध घेतल्यास ते नक्कीच आरोग्यदायी असते. जन्मापासून दूध हेच मुख्य अन्न असल्याने ते आयुष्यभर उपयुक्त ठरते. दुधामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने असतात, जी आरोग्याला उपयुक्त ठरू शकतात. हाडे मजबूत राहण्यासाठीही दुधाचा उपयोग होतो.

कॉण्टॅक्ट लेन्सपासून सावध

चष्मीश झालेले कोणाला आवडेल? विशेषत: कमी वयात चष्मा लागला असेल तर तो नकोच असतो कारण चष्मा असेल तर लग्नात अडथळे येतात. मुलाकडची मंडळी, चष्मेवाली मुलगी नको असे स्पष्ट सांगतात. चांगली स्थळे हातची जातात. पण चष्मा लागलाच तर काय करणार? त्यावर इलाज म्हणजे कॉण्टॅक्ट लेन्स. हजारो मुली चष्म्याच्या ऐवजी कॉण्टॅक्ट लेन्स लावत असतात. पण आता काही निरीक्षणांती शास्त्रज्ञ अशा निष्कर्षाप्रत आले आहेत की कॉण्टॅक्ट लेन्स लावणे हे धोक्याचे आहे.

नळाच्या पाण्यात असणारा एक जंतू कॉण्टॅक्ट लेन्सच्या माध्यमातून डोळ्यात आणि बुबळात प्रवेश करतो आणि डोळ्याला अपाय करतो. त्यातून कदाचित अंधपणाही येऊ शकतो. या जंतूचे नाव ॲकान्थमोईबा असे आहे. तो नळाच्या पाण्यात जसा सापडतो तसाच तो धुळीत, समुद्राच्या पाण्यात, पावसाच्या पाण्यात आणि जलतरण तलावातल्या पाण्यातही सापडतो. हा जंतू अनेकांना अंधत्व बहाल करण्याची शक्यता आहेच, पण ती शक्यता कॉण्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्यांच्या बाबतीत अधिक आहे. या जंतूचा संसर्ग होण्याचे एकूण प्रकार कमीच आहेत, पण त्यावर उपचार फार काळपर्यंत करावे लागतात आणि त्यातूनही गुण येण्याची शक्यता कमीच असते. म्हणून त्याच्यापासून सावध राहिले पाहिजे. या प्रकाराची माहिती 'डेली मेल' या दैनिकाने प्रसिद्ध केली आहे. या जंतूचा उपसर्ग होण्याची शक्यता कॉण्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्यांच्या बाबतीत जास्त आहे. कारण या लेन्सचे आपल्या डोळ्यातले स्थान वेगळेच असते. स्कॉटलंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ स्कॉटलंड मधील संशोधक डॉ. फियोना हेन्रीक्वेझ यांनी हे कारण आपल्या निरीक्षणातून शोधून काढले आहे. कॉण्टॅक्ट लेन्स वापरणाच्या व्यक्तीच्या नजरचुकीने लेन्स घालताना ते या जंतूसह घातले गेले तर ते बुबळात प्रवेश करतात आणि लेन्सच्या आधाराने तिथेच राहतात. एकदा तिथे प्रवेश मिळाला की त्यांना बाहेर जाता येत नाही. तिथेच ते आपले काम सुरू करतात. बुबळाला टोकरायला लागतात आणि आत प्रवेश करतात. तिथेच त्यांची वीण वाढते आणि त्यांचे काम व्यापक होऊन जाते. डोळ्याची क्षमता कमी होते.



या जंतूचा प्रादुर्भाव झाला असेल तर डोळ्यांतून सतत पाणी येते. डोळ्यांचा दाह होतो. समोरचे दृश्य पुसट दिसायला लागते. डोळ्याला प्रकाश सहन होत नाही. वरची पापणी सुजते आणि तिला वेदना होतात. काही तज्ज्ञांच्या मते तर या जंतूच्या संसर्गामुळे साधारण आठवडाभराच्या काळात दृष्टी जाऊ शकते. अर्थात या त्रासावर इलाज आहेच. काही ड्रॉप्स त्यासाठी सुचवले जातात. तर वीस मिनिटाला ते डोळ्यात टाकले तर तीन आठवड्यांमध्ये हा त्रास कमी होऊ शकतो. मात्र या काळात रुग्णाला रुग्णालयात ॲडमिट व्हावे लागते. त्रास अधिक प्रमाणात असल्यास शस्त्रक्रिया करावी लागते.

लिंबूपाणी प्या आणि सदैव निरोगी राहा

सदैव ताजेतवाने आणि फ्रेश राहण्यासाठी लिंबूपाण्याचे सेवन नियमित केलेले चांगले. लिंबूमध्ये 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असते. शरीरासाठी आवश्यक असणारी 'क' जीवनसत्वाची कमतरता लिंबूपाणी सेवनाने भरून काढता येते.

लिंबूपाणी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याबरोबरच पोटॅशिअमचीही गरज पूर्ण होते. पोटॅशिअममुळे आपल्या मेंदूला फायदा होतोच आणि ब्लडप्रेशरवरही ताबा ठेवता येतो. तुम्हाला जर चहा कॉफीची सवय कमी करायची असेल तर लिंबूपाणी उत्तम. लिंबूपाणी सेवनाचा आणखी एक फायदा तो म्हणजे रक्तशुद्धी ज्यामुळे शरीर स्वस्थ राहण्यास मदत होतेच आणि शरीर ताजेतवाने राहते. जीवनसत्त्वाने भरपूर आणि लाभदायक असे हे लिंबूपाणी कधीही सेवन केले तरी चालते मात्र रात्री जेवणानंतर घेऊ नये. हे आपल्या शरीरासाठी हानीकारक ठरू शकते.

दातांचा पिवळेपणा घालवा केवळ एका सोप्या उपायाने

येथे आम्ही आपल्याला चार उपाय सांगत आहोत ज्यातून एक जरी उपाय नियमाने केला तर दातांचा पिवळेपणा घालवता येईल.

मीठ आणि लिंबू

एक चमचा लिंबाच्या रसात दोन चमचे समुद्री मीठ मिसळून पेस्ट तयार करा. ब्रशच्या मदतीने दातांवर हलक्या हाताने घासा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा वापरा. अशाने लिंबू दातांना नैसर्गिकरीत्या ब्लीच करेल आणि पिवळा थर काढण्यास मदत करेल.

बेकिंग सोडा आणि लिंबू

एक चमचा बेकिंग सोडा घेऊन त्यात २ चमचे लिंबाचा रस मिसळा. ही पेस्ट दातावर लावून ३ ते ४ मिनिट तसेच राहू द्या. नंतर पाण्याने गुळण्या करा. बेकिंग सोड्यात आढळणारे ब्लीचिंग गुण दातांना स्वच्छ करतील. हा प्रयोग आठवड्यातून दोनदा करू शकता.

ऑर्गेनिक कोकोनट ऑईल

ऑर्गेनिक कोकोनट ऑईलमध्ये लोरिक ॲसिड आढळतं. याने दातातील पिवळेपणा दूर होऊन दात मजबूत होतात. यासाठी तेलाचे काही थेंब दातावर लावून बोटाने मसाज करावी. नंतर ५ मिनिटे असेच राहू द्यावे. नंतर गुळण्या कराव्या.

ॲप्पल साइडर व्हिनेगर

१ कप पाण्यात दोन चमचे ॲप्पल साइडर व्हिनेगर टाकून त्याने गुळण्या केल्याने दात पांढरे दिसू लागतात सोबतच तोंडातील दुर्गंध दूर होते.

केळीच्या तुकड्याने करा मसाज

पोटॅशियमयुक्त केळ वापरल्याने दातांवरील पिवळेपणा आणि दुर्गंध दूर होते. याने दात मजबूत होतात. केळीचे तुकडे दातावर घासत ५ मिनिटांपर्यंत मसाज करावी. नंतर कोमट पाण्याने गुळण्या कराव्या. याने दात स्वच्छ आणि चमकदार होतात.

साडी नेसण्याचे ५ वेगवेगळे प्रकार

खरं तर साडी कोणत्याही शरीराच्या प्रकारावर शोभून दिसते, जर चांगली टेक्निक वापरून नेसली तर कोणतीही महिला यामध्ये स्लिम दिसू शकते. साडी नेसण्याचे अनेक प्रकार आहेत; तथापि काही विशिष्ट स्टाइलसाठी आकार, लांबी आणि डिझाइनच्या साडीची आवश्यकता असते. साडी ही सर्वात जुनी तरीही मोहक पोशाख आहे. तरीही सगळ्यांनाच चांगला प्रकारे साडी नेसता येतेच असे नाही. नोंदणीकृत ८० प्रकारांपेक्षा अधिक पद्धतीने साडी नेसता येऊ शकते. कमरेला गुंडाळून खांद्यावरून पदर काढून खालच्या भागात सैल गोलाकार घेर सोडणे ही सर्वात सामान्य पद्धत आहे. एका साडी बरोबर, तुम्ही वेगवेगळ्या प्रकारे लूक आणि स्टाईल प्राप्त करू शकता! तुम्ही प्रयत्न केल्यास नक्कीच स्लिम फिट साडी तुम्हाला नेसता येऊ शकते. आज जाणून घेऊया पारंपरिकसह वेगवेगळ्या आधुनिक पद्धतीने साडी नेण्याचे महत्त्वाचे ५ प्रकार.

असं म्हटलं जातं की 'बदल नियमित असतो' परंतु जेव्हा फॅशनचा विषय येतो तेव्हा ते खरं ठरत नाही. अनेक शतकापासून पारंपरिक साडीचा ट्रेंड आजही कायम आहे. साडी हे असे वस्त्र आहे जे स्त्रियांची सुंदरता वाढवतेच आणि कालमर्यादा दर्शवते, भारत कांजीवरम, बनारसी, पैठणी अशा विविध प्रकारच्या साड्यांचे भांडार आहे.

१. स्कार्फ / नेक रॅप स्टाईल :

स्कार्फ / नेक रॅप स्टाईल हे केवळ आधुनिक आणि स्टाइलीशच नाही तर थंड हवेच्या ठिकाणी किंवा हिवाळ्यामध्ये साडीचा हा प्रकार शरीराला उबदार ठेवण्यास मदत करतो.

पद्धत : नेहमीसारखा साडीला पदर काढण्या ऐवजी, पदराचा वेगवेगळ्या पद्धतीने स्कार्फसारखा वापर करा. जेव्हा तुम्हाला तुमची साडी तुमच्या गळ्याभोवती गुंडाळायची असेल, तेव्हा जसा ट्रेंड चालू असेल त्याप्रमाणे करावे. नेक बेल्ट किंवा इतर ॲक्सेसरीज जोडाव्या, जेणेकरून ग्लॅमरस लूक मिळेल.

२. केप स्टाइल

ही एक साडी नेसण्याची वेगळी पद्धत आहे, गळ्यापासून ते छातीपर्यंत गोलाकार पद्धतीचा पारदर्शक फॅब्रिकचा विणलेला केप असतो, त्याला केप स्टाईल साडी म्हणतात.

पद्धत : थोडासा ग्लॅमरस लूक देण्यासाठी हा योग्य प्रकार आहे. तुम्हाला जी हवी ती साडी घ्या आणि तुमच्या निवडलेल्या साडी सोबत मॅच होईल असे एक केप घ्या. तुमच्या गळ्यामध्ये केप घाला, तुमचा गळा ते छाती म्हणजे तुमचा ब्लाऊज झाकला जाईल याचा प्रयत्न करा. जरी ब्लाऊज झाकला जात असला तरी पारदर्शक केपमुळे तुमचा ब्लाऊजही त्यातून उठून दिसेल. वेगवेगळ्या डिझाईन आणि एम्ब्रॉडायरीचा केप तुम्हाला आकर्षक लूक देण्यास मदत करेल.

३. बेल्ट स्टाईल

बेल्ट साडी हा प्रकार आपल्या पारंपरिक कमर पट्टा, नववधूच्या साडीवर आधारित आहे. यावर पातळ, रुंद किंवा कापडी बेल्ट देखील वापरला जाऊ शकतो.

पद्धत : आपल्या साडीला सामान्यपणे ड्रेप करा आणि तुमच्या कमरेवर बेल्ट घाला. तुम्हाला अधिक पारंपरिक लूक हवा असल्यास तुम्ही कमरबंध किंवा कमर पट्टा वापरू शकता. या साडीवर ऑफ शोल्डर किंवा इतर स्टाइलचे ब्लाऊज वापरू शकता. यामध्ये तुम्ही पदर ही बेल्टला जोडू शकता.

४. धोती स्टाईल

पुढच्या वेळी जेव्हा आपण लग्न समारंभात जाणार असाल उपस्थित राहाल तेव्हा हे ऑफबीट पहा. धोती स्टाईल साडी ही पँट स्टाईल साडी सारखीच असते आणि ही साडी परंपरा आणि आधुनिकतेचे सुंदर मिश्रण आहे. उत्कृष्ट साडी ड्रेपिंगसह सहज कॅरी करणाऱ्या सामंथा, शिल्पा शेट्टी आणि सोनम कपूर यांच्यासारख्या प्रसिद्ध अभिनेत्रींनी धोती साडी लोकप्रिय केली आहे.

पद्धत : चांगल्या ड्रॅपिंगसाठी आपण पेटीकोट ऐवजी लेगिंग वापरू शकता. थोडीशी धोती स्टाईल आहे, परंतु नेसवणे आणि सजवणे अतिशय सोपे आहे. १ ते २ मीटर साडी कमरेच्या भोवती गुंडाळा, पदर काढू नका. आता डावीकडील आणि उजवीकडील भाग दोन्ही मागच्या बाजूने काढून ते पिन करून घ्या, ज्यामुळे धोती सारखा आकार दिसेल. तिथून ३ ते ४ प्लेट्सचे पदर काढून ब्लाउजवर वर पिन करा. पदर शक्यतो लांब असू द्या. यामध्ये प्रिंटेड साडी टाळा, कारण त्यामुळे धोती स्टाईल स्पष्ट दिसत नाही. प्लेन कलरमध्येच साडी निवडा.

५. जलपरी स्टाईल :

मुमताज साडी आणि लेहेंगा साडीबरोबर तुम्ही जर मर्मेड स्टाईल (जलपरी) साडीची तुलना केली तर येथे जास्त फरक जाणवत नाही. सर्व काही एकसारखेच वाटते, परंतु जेव्हा तुम्ही पदर पुन्हा ड्रेप करता तेव्हा त्यात जो बदल येतो तो लक्षणीय असतो.

पद्धत : या ड्रेपिंग स्टाइलमुळे प्लेट्सचा खालचा भाग बाहेर पसरतो, ज्यामुळे त्याचा आकार एखाद्या माश्याच्या शेपटी प्रमाणे दिसतो. बघून असं वाटतं की या साडीवर खूप मेहनत करावी लागत असेल, परंतु केवळ काही अतिरिक्त टक्स आणि प्लेट्स आवश्यक आहेत. या साडीचे पदर इतर कोणत्याही साडीपेक्षा अधिक पटकन दिसतो. म्हणून मोठा, भरजरी आणि नक्षीकाम काम केलेला पदर निवडा.

पीरियड्सच्या वेदनांपासून मुक्तीसाठी त्या दिवसात काय खावे जाणून घ्या!

मासिक धर्म वेदनांपासून मुक्तीसाठी आहारात सामील करा हे पदार्थ

दर महिन्यात चार दिवस किंवा एका आठवडा महिलांवर मासिक धर्माचे दिवस फार जड जातात. पीरियड्स येण्यापूर्वी आणि त्या दरम्यान अनेक त्रासाला सामोरं जावं लागतं. अशात महिलांनी त्या कशा प्रकारचा आहार घेत आहेत याकडे लक्ष द्यावं कारण याचा परिणाम आरोग्यावर होतो. जाणून घ्या या वेळेत काय खावे आणि काय नाही.

अख्खं धान्य वाळवलं किंवा प्रोसेस केलं जात नाही त्यामुळे यातील पोषक तत्त्व टिकून राहतात. हे कार्बोहायड्रेट्स आहेत जे सेरोटोनिन रिलीज करतात. सेरोटोनिन हार्मोनमुळे या दिवसात आराम जाणवतो.

पीरियड्सदरम्यान भूक कमी होऊन जाते आणि शरीरात आयरनची पातळी कमी होऊ लागते म्हणून यादरम्यान दुपारच्या जेवण्यात हिरव्या पालेभाज्या सामील कराव्या. याने शरीराला पुरेसे पोषक तत्त्व आणि व्हिटॅमिन्स 'ड' मिळतं. हे रक्तस्राव आणि ब्लड क्लॉटिंगला नियंत्रित करतं.

पीरियड्सदरम्यान सॅलमन आणि टूना सारखे मासे खाल्ल्याने वेदनांपासून मुक्ती मिळते. यात भरपूर प्रमाणात प्रोटीन आढळतं.

पीरियड्समध्ये गोड खाण्याची इच्छा होते. अशात केक किंवा मिठाई सारखे इतर काही गोड पदार्थ खाण्यापेक्षा गोड फळं खाणे योग्य ठरेल.

यादरम्यान ताण, चिडचिड यापासून मुक्तीसाठी मिंट किंवा आळं-मधाचा चहा पिणे योग्य ठरतं. याने मानसिक शांती मिळते.

पीरियड्सच्या दरम्यान काळं मीठ मिसळून कोमट पाण्याने अंघोळ केल्याने आणि भरपूर झोप घेतल्याने आराम मिळतो.

हे पदार्थ टाळा

कॉफी किंवा कॅफीनयुक्त पेय पदार्थ. याने ताण वाढतो आणि डिहायड्रेशनचा धोका असतो.

तळकट पदार्थांचे सेवन टाळावे. याने वेदना वाढतात.

साखरेचे सेवन करणे टाळावे. याने सुस्ती वाढते आणि ताण व चिडचिड होते.